विद्या विकास मंडळ

रामकृष्ण महादेव साळगांवकर उच्च माध्यमिक विद्यालय

मडगांव गोवा

प्रथम सत्र परीक्षा - ऑक्टोबर २०२५

| | | |
|---|---|---|
| इयत्ता : बारावी | विषय : मराठी (व्दितीय भाषा) | वेळ : ३ तास |
| दिनांक : ७।१०।२०२५ | | गुण : ८० |

---

सूचना : (i) शुध्द्लेखनाचे नवीन नियम पाळावेत.

(ii) उजवीकडील अंक प्रश्नांचे पूर्ण गुण दर्शवितात.

## विभाग 1 - व्याकरण

खालील शब्दांची भाववाचक नामे लिहा :

1. सावध — 1
2. पोरका — 1
3 व्याकूळ — 1

खालील शब्दांची विशेषणे लिहा :

4. प्रेम — 1
5. रान — 1
6. कृपा — 1

खालील शब्दांचे विरूध्दार्थी शब्द लिहा :

7. सामान्य — 1
8. आशा — 1
9. जीवन — 1

खालील शब्दांचे लिंग बदलून लिहा :

10. कारभारीण 1

11. देव 1

12. धोबी 1

खालील शब्दांचे वचन बदलून लिहा :

13. भाकरी 1

14. दगळे 1

15. चेहरा 1

खालील वाक्यातील अधोरेखित शब्दांच्या जाती लिहा :

16. जागा झाल्यावर चारी पाय ताणून जांभई दिली आणि डोळे उघडले. 4

## विभाग 2 - गद्य

खालील प्रश्नांची उत्तरे प्रत्येकी एका वाक्यात लिहा :

17. काझिरंगा अभयारण्यात दिसलेल्या गेंड्याची तुलना लेखकांनी कोणाशी केली आहे? 1

18. लेखक मधु मंगेश कर्णिक यांना बालपणी मंगेश देवापेक्षाही चित्रातले गांधीजी का आवडायचे? 1

19. नव्या मैत्रिणीवर रूबाब मारण्यासाठी मांजर झालेल्या लेखकाने काय केले? 1

खाली दिलेली वाक्ये योग्य पर्याय निवडून पूर्ण करा :

20. चिखलानं माखलेलं पण वाळलेलं, गेंड्याचं वरचं अंग _________ 1

अ. घरगुती पायजमा शर्टात असलेल्या इनस्पेक्टरासारखं दिसत होतं .

आ. कुंभमेळ्यातल्या गोसाव्यासारखं दिसत होतं.

इ. जैन साधुसारखं दिसत होतं.

21. लेखकाने मांजर व्हायचे ठरविले कारण ________ 1

अ. त्यांना नोकरीचा कंटाळा आलेला होता.

आ. त्यांची बायकोमुले माहेरी गेली होती.

इ. त्यांना इतरांच्या घरांतील पदार्थांवर ताव मारायचा होता.

22. 'श्री मंगेश 'शाच्या उग्र तरी मायाळू वाटणाऱ्या चित्राप्रमाणे ______ 1

अ. खादीबापू तिरोडकरांची ती तसबीर देवस्वरूप वाटायची.

आ. गांधीजींची ती तसबीर देवस्वरूप वाटायची .

इ. वडिलांची ती तसबीर देवस्वरूप वाटायची.

खालील वाक्याचे संदर्भासह स्पष्टीकरण लिहा :

23. " निसर्ग हा सर्वांत मोठा गुरु आहे." 5

किंवा

' एका वाघाची मान गेंड्यानं फाडली होती आणि दुसरा वाघही रक्तानं माखलेला दिसत होता.'

खालील प्रश्नाचे उत्तर 7 ते 8 ओळींत लिहा :

24. पाणबुड्यांनी मोत्यांचे हारे समुद्रात का फेकून दिले? 5

किंवा

विनाकारण लाथ मारणाऱ्या केळकरीण बाईला मांजर झालेल्या लेखकाने कसा धडा शिकविला?

## विभाग 3 - पद्य

खालील प्रश्नांची उत्तरे प्रत्येकी एका वाक्यात लिहा :

25. संत एकनाथ महाराजांच्या गुरुचे नाव सांगा. 1

26. 'सागरा प्राण तळमळला' या कवितेत एकाच आचमनात समुद्र प्राशन करणारे ऋषी कोण ? 1

27. कवी बा.भ. बोरकरांच्या मते माणसाची पावले कशी असावीत? 1

खाली दिलेल्या कवितेच्या ओळी योग्य पर्याय निवडून पूर्ण करा :

28. ______न देखता गाई हुंबरती I झाले मजप्रती तैसे आता II 1

29. मार्गज्ञ स्वयं मीच ________ वाहीन ,त्वरित यापरत आणीन 1

30. देखणे ते________ की जे ओविती मुक्ताफळे 1

( पृष्ठि , ओठ , सृष्टी, पत्ता )

खालील पद्यांशाचे संदर्भासह स्पष्टीकरण लिहा :

31. जीवनावेगळे मत्स्य तळमळती । झाले मजप्रती तैसे आता ॥ 5

किंवा

विश्वसलों या तव वचनी,मी,

जगदनुभवयोगें बनुनी , मी

खालील प्रश्नाचे उत्तर 7 ते 8 ओळींत लिहा :

32. संत एकनाथांनी आपल्या गुरूचे महात्म्य 'गुरुमहिमा' या अभंगातून कसे वर्णन केले आहे? 5

किंवा

'मायें ग मायें' या कवितेत ग्रामीण मुलीची शिक्षण घेण्याची तळमळ कशी दिसून येते?

## विभाग 4 – लेखन

खाली दिलेल्या वाक्प्रचारांना त्याखाली दिलेल्या अर्थाचा योग्य पर्याय निवडून लिहा :

33. हातभार लावणे________________ 1

- बाजूला सारणे
- मदत करणे
- पुरेपूर कष्ट करणे
- मारणे

34. जायबंदी होणे____________________ 1

- गोळी घालणे
- हल्ला करणे
- त्रास होणे
- जखमी होणे

35. लग्गा साधणे ________________ 1

- कार्य साधणे
- स्वस्तात घेणे
- पळून जाणे
- प्रभाव टाकणे

36. घायकुतीला येणे________ 1

- लाचार होणे
- खंत वाटणे
- अस्वस्थ होणे
- काळजी नसणे

खालील उतारा वाचून त्याखाली दिलेल्या प्रश्नांची उत्तरे लिहा.

व्यसन हा एक मानसिक आजार होऊन बसला आहे. दारू, सिगरेट, तंबाखू इत्यादी मादक अंमली पदार्थांच्या सेवनाने मानवी शरीरावरती मोठा परिणाम होत आहे. या मादक पदार्थांच्या सेवनाने जीवनातील दुःख, ताण व नैराश्य दूर होते, अशी एक खोटी सबब काही जणांकडून दिली जाते. मात्र त्यात काही तथ्य नाही. एकदा नशा उतरला की माणूस पुन्हा त्याच फेऱ्यात अडकतो.

आजचा युवावर्ग मित्रांच्या दबावामुळे, आग्रहाखातर, चुकीच्या कल्पनेमुळे, एक स्टाईल, थ्रिल, मौजमजा, जोश,जगावेगळं काहीतरी करण्याच्या विचाराने व्यसनाकडे वळत आहे. या व्यसनाशिवाय तो राहू शकत नाही आणि ते मिळाले नाही तर कोणत्याही थरापर्यंत जाण्यासाठी तयार आहे. मात्र आपल्या या वागण्याने आपण नातेवाईका पासून दूर जात आहोत, सामाजिक जीवनात बदनाम होत आहोत, आयुष्याची एक एक पायरी खाली उतरत आहोत, याचा त्यांना विसर पडत आहे. त्यामुळे प्रत्येकाने व्यसनमुक्त राहून चांगले जीवन जगण्याचा प्रयत्न करावा. युवकांनी आपल्या अंगी असलेल्या छंदांचा व्यासंग बाळगावा. जीवनातील नैराश्य घालविण्यासाठी विविध खेळ खेळा, वाचन करा, व्यायाम करा, चांगले मित्र जोडा व सामाजिक जीवनात कार्यरत रहा. तुमचं जीवन सुंदर बनेल.

गुलदस्ता : मृणालिनी कुलकर्णी

प्रश्न :

37. व्यसनाबद्दल कोणती खोटी सबब दिली जाते ? 1

38. आजचा युवक व्यसनाकडे का वळत आहे ? 2

39. जीवनातील नैराश्य घालविण्यासाठी युवकांनी काय करायला हवे ? 2

40. 'ज्ञानोदय उच्च माध्यमिक विद्यालय ' सांगे येथे संपन्न झालेल्या 'वनमहोत्सव' कार्यक्रमाचा वृत्तांत 10 ते 12 ओळीत लिहा. 5

41. ' पौष्टिक आहार व त्याचे फायदे' या विषयावर दोन मित्र/ मैत्रिणींमधील संवाद सुमारे 10 ते 12 ओळीत लिहा. 5

42. खालीलपैकी कोणत्याही एका विषयावर सुमारे पंचवीस ओळींचा निबंध लिहा. 10

भ्रष्टाचार संपला तर.........

किंवा

जीवनात पाण्याचे महत्त्व

किंवा

मी पाहिलेली निसर्गरम्य संध्याकाळ

किंवा

एका वृध्दाचे आत्मवृत्त

किंवा

माझा आवडता महिना : श्रावण